# VASUNDHARA COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE, GHATNANDUR

NAAC Accredited 'B' Grade, With CGPA 2.47.

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Dr. Arun Dalve
(M.A., B.Ed., Ph.D.)
Principal

Mob:9424342148
Mob:9822898727
Mob. 9923019540
Website: www.vasundharacollege.org
E-mail - Principalvcg@rediffmail.Com

E-mail-vasundharacollege2000@gmail.com

Ghatnandur, Tq. Ambajogai, Dist. Beed, Pin – 431519 (Maharashtra)



Outward No.VCG /20 Date / /

3.3.1

## 3.3.1 Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC website for academic year 19-20

| Sr. no | Name of teacher | Name of journal | Title of paper | ISSN number | Page No |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Prof. Jogdand M.B. | Power of Knowledge | Matang Samajachya Rajkiya Sanghatnanche Yash Apyash ek Adyayan | 2320-4494 | 2 to 7 |
| 2 | Dr. More A.M. | Our Heritage | Shashwat Sheti Vikas Va Shaskiya Yojana | 0474-9030 | 8 to 13 |
| 3 | Dr. More A.M. | Our Heritage | Shashwat Vikasatil Dhokyanche Vyavasthapan | 0474-9031 | 14 to 21 |
| 4 | Dr. More A.M. | Our Heritage | Aarthik Vikasat Mahila Bachat Gatanche Yogdan | 0474-9032 | 22 to 26 |

PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519




PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | STUDIES ON INCIDANCE OF INFECTION AND INTENSITY OF INFECTION OF CESTODE STILESIA FROM CAPRA HIRCUS | GARAD V. K.<br>BHOGIL A. R. | 1-10 |
| 2 | IMPACT OF E-EDUCATION ON INDIAN PRESENT EDUCATION | Dr. Chandrakant W. Gajewad | 11-13 |
| 3 | A STUDY OF DIFFERENCES IN INTELLIGENCE, FAMILY CLIMATE, SCHOOL ENVIRONMENT, STUDY HABITS AND ACADEMIC ACHIEVEMENT OF STUDENTS IN VIDARBHA REGION IN RELATION TO AREA AND SEX . | Prof. Shweta T. Aglawe | 14-19 |
| 4 | Horticultural productivity analysis for per hectare production in sangola tahashil: geographic view | Dr. S.M .Mulani | 20-23 |
| 5 | Impacts of Human Trafficking | Pornima Omprakash Dagdiya<br>Prof. Dr. Aparna Kotapalle | 24-27 |
| 6 | Digital Marketing | Dr.Vidyullata Rahul Hande | 28-32 |
| 7 | Historical Background, Cultural and Physiographical Aspects of Beed District (MS) India. | Dr. V.L. Phad | 33-39 |
| 8 | Importance of Soft Skills in LIS Professionals | Telke Sudhakar B. | 40-42 |
| 9 | महानुभाव साहित्यातील पद्यग्रंथःसातीग्रंथ | डॉ.विनोद अवधूतराव कोकणे | 43-50 |
| 10 | मराठी पंडित कवी : विठ्ठल बीडकर | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 51-53 |
| 11 | शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात प्रधानमंत्री पीक योजनेचे महत्व | प्रा. डॉ. व्यंकटेश काळूराम मदनुरे | 54-58 |
| 12 | एक आदर्श राजा छत्रपती शिवाजीमहाराज | श्री. लहु बाबुराव राठोड | 59-61 |
| 13 | क्रांतीकारी महापुरुष - संत सेवालाल महाराज | श्री. लहु बाबुराव राठोड | 62-65 |
| 14 | भारतीय अन्नसुरक्षा समोरील आव्हाने : एक अध्ययन | प्रा. दिक्षित साहेबराव ज्ञानोबा | 66-70 |
| 15 | कला के उपासक - राजर्षि शाहु महाराज | डॉ.सविता चोखोबा किर्ते | 71-74 |
| 16 | मातंग समाजाच्या राजकीय संघटनांचे यश-अपयश : एक अध्ययन | प्रा.जोगदंड मकरंद बळीराम | 75-78 |
| 17 | "सहज - सुलभ वाचन सवय हाच खरा स्त्री अलंकार | प्रा. ज्योती शा. मगर | 79-84 |
| 18 | "स्त्रियांच्या ओवीगीतातील कृषी अवजारे" | प्रा.डॉ.भा.ना.गाडेकर | 85-95 |
| 19 | आदिवासी कविता की पड़ताल | प्रा.युवराज इंद्रजित जाधव | 86-101 |


PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

# मातंग समाजाच्या राजकीय संघटनांचे यश-अपयश : एक अध्ययन

प्रा.जोगदंड मकरंद बळीराम
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
वसुंधरा महाविद्यालय,घाटनांदूर, ता.अंबाजोगाई जि.बीड

**प्रस्तावना**

देशातील सर्वच जाती, धर्माच्या व्यक्तिंना समान स्वातंत्र्य अधिकार असले पाहिजेत समान स्वातंत्र्य व अधिकार असतील तरच त्या देशाचा आणि समाजाचा सर्वांगीण विकास घडून येतो. अशा समतावादी देशात राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता सामाजिक समता या संकल्पना यशस्वी होतात.

भारतीय समाजात प्रमुख सहा धर्म त्यांचे पंथ, उपपंथ, तीन हजार जाती व पोट, जाती, चार वर्ण अशी विविध स्वरुपात विभागणी होवून समाजव्यवस्था निर्माण झाली आहे. या समाजव्यवस्थेत स्पृश्य आणि अस्पृश्य हे प्रमुख दोन गट असून अस्पृश्य गटात महार, मांग, चांभार, ढोर इत्यांदींचा समावेश केलेला दिसून येतो. या अस्पृश्य समाजाला व्यक्तीस्वातंत्र्य आणि मानवी अधिकार मिळवून देण्याकरिता ब्रिटिश सरकार, भारतीय समाज सुधारकामध्ये म.फुले, राजर्षी शाहु महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, सयाजीराव गायकवाड, म.गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सातत्याने प्रयत्न केले.[१]

भारतीय समाजसुधारकांच्या कार्याने प्रभावित होऊन मातंग समाजातील तरुणांनी मातंग समाजाला संघटित करुन शासन स्तरावर सामाजिक स्तरावर आपले अस्तित्व दर्शविण्याकरिता मातंग संघटना स्थापन करुन पुढाकार घेतला. त्यामध्ये मातंग समाजाचे प्रेरणास्थान अण्णाभाऊ साठे, लहुजी साळवे, मुक्ता साळवे, ॲड. भिंगरदिवे, मारोती कांबळे, तुळशीराम शिंदे, बापुराव खोतकर, आमदार देवरावजी कांबळे, आमदार बाबुराव भास्कर इत्यादी कार्यकर्ते निर्माण झाले. या कार्येकर्त्यांनी वेगवेगळया संघटनांची स्थापना करुन मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरुध्द आंदोलने, चळवळी उभारुन अन्याय अत्याचाराला प्रतिकार केला.

या संघटनांमध्ये दलित पँथर, महाराष्ट्र युवक परिषद, मांग समाज सुधारक समिती, अण्णाभाऊ साठे संघर्ष समिती, दलित स्वंयसेवक संघ, अखिल भारतीय मातंग समाज, अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन तर महाराष्ट्रात क्रांतीवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ, लक्ष्मण ढोबळे यांनी बहुजन रयत परिषद, व्ही.जी.रेड्डी यांनी दलित विकास आघाडीची स्थापना केली. तसेच सचिन बागडे यांनी दलित युवक आंदोलन संघटना स्थापन केली. एकनाथ आवाड यांनी मानवी हक्क अभियान या राष्ट्रस्तरावरील संघटनेची स्थापन केली. त्याच बरोबर बहुजन मजुर पक्षाचीही स्थापना करण्यात आली.[२]

सदरील विवेचनाला अनुसरुन अध्ययनासंबधी खालीलप्रमाणे उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली आहे.



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

कर्ज द्यावे, इत्यादी उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून ही समिती स्थापन करण्यात आली. परंतू या समितीमधील सभासद हे इतर राजकीय पक्षात गेले. तर सुशिक्षित सभासदांनी समिती सोडून दिली. त्यामुळे समितीचा प्रभाव कमी होवून ती ऱ्हास पावली.[७]

अशाच प्रकारे मातंग समाजाच्या सर्वांगीण हिताकरिता वेगवेगळया संघटनांच्या स्थापना झाल्या. त्यामध्ये दलित स्वयंसेवक संघ या ही संघाने मातंग समाजाला आरोग्य, आर्थिक, शैक्षणिक,भौतिक सुविधा मिळाण्या करिता सातत्याने कार्य केले. अखिल भारत मातंग समाज या संघटनेने मातंग समाजातील स्त्रिया, मुली यांच्यावर होणाज्या अन्याय अत्याचाराच्याविरुध्द आंदोलने करुन पिडीतांना न्याय मिळवून दिला. त्याच बरोबर प्रबळ जातीच्या वर्चस्वाखालून मातंग समाजाला मुक्त करण्याकरिता सातत्याने प्रयत्न केले. तर क्रांतीवीर लहुजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघाने मातंग समाजाच्या सर्वच कर्मचारी व्यक्तींना कायमस्वरुपी नोकरीत हमी, योग्य वेतन, आरोग्य सुविधा, या करिता कार्य केले.

**अध्ययनाचे महत्त्व :**

सदरील अध्ययनाअंती मातंग समाज स्वत:चे अस्तित्व आणि सामाजिक दर्जा टिकविण्याकरिता ज्या विविध समित्या संघटना स्थापन करीत आहे त्यांच्या अपयशाची कारणे सहज लक्षात येण्यास मदत होईल. त्यातून संघटना, समित्या अथवा आंदोलन याबाबतची कमेटी करताना सभासदांची निवड योग्य पध्दतीने करण्यास मदत होईल. संघटना, समिती, आंदोलन कोणत्या अटी व नियमांची तरतूद केल्यामुळे टिकून राहिल याचे नियोजन करता येईल.

**सारांश :**

मातंग समाजाच्या राजकीय संघटनांचे यश-अपयश यांचे अध्ययन केले असता निदर्शनास येते की, मातंग समाजातील व्यक्ती सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा या घटकांना महत्त्व देतात. त्यामुळेच ते सत्तेच्या लोभा पोटी संघटना सोडतात तसेच संपत्ती करिता संघटना सोडून राजकीय पक्षाची पताका हाती घेतली जाते. त्यामुळे मातंग समित्या, संघटना चळवळी, अपयशी ठरत आहेत. अपयश टाळण्यासाठी आणि मातंग समाजातील सर्वसामान्य व्यक्तींनी काळानुरुष सतत जागृत राहणे गरजेचे आहे.

**संदर्भसुची :**

१) प्रा.सौ.सुनंदा भद्रशेटे, भारतीय सामाजिक आंदोलने, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१०,पृष्ठ क्र.४२.
२) डॉ.दा.धो.काचोळे, मांगवाडा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१९, पृष्ठ क्र. ३७६,३७७.
३) प्रा.गंदेवार व्ही.जी., सामाजिक संशोधन पध्दती, अरुणा प्रकाशन लातूर, २००६ पृष्ठ क्र. १८.
४) डॉ.दा.धो.काचोळे, मांगवाडा, कैलाश पब्लिकेशन्स,औरंगाबाद, २०१९, पृष्ठ क्र. ३७६.
५) किता पृष्ठ क्र. ३७९.
६) प्रा.बी.सी.सोमवंशी, महाराष्ट्रातील मांग, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, २०१५,पृष्ठ क्र. ६९.
७) चंद्रकांत वानखेडे, मातंग प्राचिनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा, नेहा प्रकाशन नागपूर, २००५, पृष्ठ क्र. ५६.



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**अध्ययनाची उद्दिष्टये**

१) मातंग समाजाच्या राजकीय संघटनांचे स्वरुप अभ्यासणे.

२) मातंग समाजातील राजकीय कार्यकर्त्यांच्या कार्याचा आढावा घेणे.

३) मातंग संघटनामधील गटबाजीची कारणे अभ्यासणे.

४) मातंग संघटनांच्या ऱ्हासाला कारणीभूत असणाऱ्या घटकांचे अध्ययन करणे.

सदरील उद्दिष्टांच्या पूर्ततेकरिता खालीलप्रमाणे गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आली आहे.

**गृहितकृत्ये :**

१) मातंग संघटनांच्या सभासदांची संख्या मर्यादित राहीली.

२) मातंग संघटनामध्ये सामुहिक हितापेक्षा स्वहीताला अधिक प्राधान्य देण्यात आले.

३) मातंग समाजातील संघटना फोडण्यास राजकीय पक्षांना यश मिळाले.

प्रस्तुत गृहितकृत्यांच्या पडताळणी करिता पुढीलप्रमाणे अध्ययन पध्दतीचा आवलंब करण्यात आला.

**अध्ययन पध्दती :**

सदरील अध्ययनाकरिता प्रामुख्याने द्वितीय स्त्रोताचा (कागदोपत्री) आवलंब करण्यात आला, त्यामध्ये प्रामुख्याने विविध संदर्भग्रंथ, क्रमीक पुस्तके, प्रकाशित व अप्रकाशित एम.फिल. पीएच.डी.प्रबंध, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, शासकीय व निमशासकीय संस्थांचे अहवाल, इंटरनेट इत्यादीचा आवलंब करण्यात आला आहे.[३]

प्रस्तुत अध्ययनाच्या मांडणीकरिता वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा आवलंब करण्यात आला आहे.

**विषय प्रतिपादन :**

मातंग समाजाने आपल्या हक्कांकरिता आणि आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला विरोध करण्यासाठी संघटना, समित्या स्थापना केल्या. त्यामध्ये ॲड.तात्यासाहेब भिंगरदिवे यांनी मांग समाज सुधारक समिती स्थापन केली. या समितीचा उद्देश मातंग समाजाने स्वाभिमानाने जगावे, त्यांना त्यांचे मानवी हक्क मिळावेत त्यांच्यावर कोणालाही अन्याय अत्याचार करण्याचा अधिकार नाही. मातंग समाजाने हिन दर्जाची कामे करु नयेत, त्यांनी आपल्या कष्टाचा मोबदला ठरवून घ्यावा. या दृष्टीने कार्य करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या विविध शाखाही स्थापन झाल्या. मातंग समाजाला स्वाभिमानी जीवन जगण्याच्या आशा दिसू लागल्या, त्यातच समितीचे सभासद कॉंग्रेस पक्षात गेले आणि समिती नावापूरती शिल्लक राहिली. हे मातंग संघटनामधील पहिले अपयश होय.

मुंबईचे मातंग समाजातील धडाडीचे कार्यकर्ते डॉ.बाबासाहेब गोपले यांनी मजुर व नोकरदार यांना रास्त रोजगार मिळावा, त्यांना कामावर कायम स्वरुपी नियुक्त करावे, त्यांना सुट्टया, आर्थिक सुरक्षितता



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

मिळावी या करिता घ्अखिल भारतीय मातंग संघङ्ग्ही संघटना स्थापन केली. या संघटनेत बहुतांशी सुशिक्षित, कारखाना मजूर, शासकीय नोकरदार सभासद घेण्यात आले. पंचवार्षिक निवडणूक येताच सभासद विविध पक्षात आर्थिक, राजकीय स्वार्थासाठी संघटना सोडून गेले. या ठिकाणी ही मातंग संघटना अपयशी ठरली. [४]

श्री.बाबुराव खोतकर यांनी औरंगाबाद येथे मातंग समाजाचा शैक्षणिक राजकीय, धार्मिक विकास करण्याकरिता महाराष्ट्र मांग युवक संघटना स्थापन केली. ही संघटना मातंग समाजाच्या मुलांना शिक्षणाकरिता शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देत होती. त्याच बरोबर मुलांच्या प्रवेश फिस, प्रवेश संख्या यावर लक्ष देत असे या संघटनेत राजकीय गट निर्माण झाले. त्याचबरोबर अशिक्षित सभासद संख्या वाढली. त्यामुळे सुशिक्षित सभासदांनी संघटनेकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संघटना बंद पडली.

डॉ. लक्ष्मण ढोबळे यांनी मातंग समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रश्न सोडवण्यासाठी 'बहुजन रयत परिषद' स्थापन केली. या परिषदेच्या माध्यमातून खेडोपाडी राहणाऱ्या मातंग समाजातील मुला-मुलींना शिक्षणाकरिता मदत केली जाते. त्याचबरोबर दलितावर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरुध्द संघटना मार्फत तक्रार केली जाते. गोर-गरीब होतकरु व्यक्तींना आर्थिक मदत मिळवून देण्याचे कार्य केली जाते. या परिषदेमध्ये ही कार्यकर्ते स्वार्थी हेतूने आपल्याच नातेवाईकांना मदत मिळवून देतात. त्यामुळे सामान्य व्यक्ती मातंग संघटना, परिषदा यांच्याकडे दुर्लक्ष करतात. हीच स्थिती बहुजन रयत परिषदेची झाली.[५]

ॲड.एकनाथ आव्हाड हा मातंग समाजातील पोतराजाचा मुलगा होय यांनी मांतग समाजाचे प्रश्न सोडवण्याकरिता राष्ट्रीय मानवी हक्क अभियान ही संघटना स्थापन केली. त्यांनी आपल्या संघटनेत शिक्षित-अशिक्षित व्यक्तिंना सभासद करुन घेतले आहे. या संघटनेमार्फत त्यांनी अनेक हरिजन व्यक्तिंना गायरान जमीन मिळवून दिली आहे. तरी ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अथवा विधानसभा, लोकसभा निवडणुकीत एकनाथ आव्हाड यांना मातंग समाजाने मदत केलेली दिसून येत नाही.

डॉ.पंढरीनाथ गायकवाड, अंबादास सगट, सौ.सावित्रीबाई चांदणे यांनी मातंग समाजातील तरुणांना नोकरी, शिक्षण, व्यवसाय या करिता आर्थिक, सामाजिक, कार्यालयीन मदत केली. त्याचबरोबर मातंग समाजातील अंधश्रध्दा, अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा या विषयी जनजागृती केली. मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची कारणे या संदर्भात परखड मत मांडले जात असे. पिडीत व्यक्तीला न्याय मिळवून दिला जात असे, तरीही दुर्देवाने ही संघटना अल्पावधीतच संपूष्टात आली. याचे कारण तरुण मंडळींना राजकीय पक्षांनी आर्थिक आणि सत्तेचे प्रलोभने दिली त्यामुळे संघटनेचे सभासद सोडून गेले. [६]

चंद्रकांत वानखेडे, नाना कांबळे आणि अजब डोंगरे यांनी मातंग समाजातील सुशिक्षीत तरुणांना विनासुट शासनाच्या नोकरीत घ्यावे, कारखान्यातील कामगारांना कायम नियुक्ती द्यावी, बेरोजगार तरुणांना रोजगाराची उपलब्धता करुन द्यावी, मातंग समाजाच्या तरुणांना रोजगाराकरिता शासनाने पाच लाख रुपये



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

# शाश्वत शेती विकास व शासकीय योजना

**प्रा.डॉ.अर्जुन मोहनराव मोरे**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*
*वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर*
*Email: moream@reddifmail.com*

*गोषवारा (Abstract):*
कृषी संबंधी शाश्वत विकास या संकल्पने मध्ये शेती व्यवसायाशी सातत्याने नवनवीन प्रयोग करुन शेती उत्पादन व व्यवसाय सुखकर करण्याचा प्रयत्न होत आहे. कृषी शाश्वत विकास प्रक्रिया मध्ये शेती मशागतीची विकसीत अवजारे, तांत्रिक पध्दतीने शेती मशागत, नवनवीन प्रयोगातून अधिक व गुणात्मक उत्पादन, उत्पादित मालाला हमीभाव, इत्यादीचा समावेश होत आहे. कृषि/ व्यवसाय विकसित व तांत्रिक पध्दतीने झाला पाहिजे या करिता शेती संबंधी शासन सतत नवनवीन योजना राबवित आहे.

**Keywords: शाश्वत शेती विकास, शासकीय योजना**

**प्रस्तावना :**

भारत हा विकसनशिल देश म्हणून ओळखला जातो. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या 127 कोटी असुन ती जागतिक लोकसंख्या पैकी 16.7 टक्के आहे. जगाच्या एकूण भुभागाचे क्षेत्रफळ यांची तुलना केली तर अधिक लोकसंख्या आणि कमी भुभाग दिसून येतो. भारतात 50 ते 60 कोटी लोक हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. या दुर्बल लोकांपैकी 40 कोटी लोक हे दारिद्रय रेषेखाली आहेत.

भारत हा खेडयाचा देश असून खेडयात 67 टक्के लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. या खेडयातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. म्हणुन भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. शेती व्यवसाय हा निसर्गाचा लहरीपणा आणि तांत्रिक शेती, मशागत, नियोजन व्यवस्थापनावर अवलंबून आहे. आदि मानवापासून आधुनिक मानवापर्यंत शेती व्यवसायाच्या पध्दती आणि नियोजनात नवनवीन प्रयोग करुन विकास घडून आणला जात आहे. त्यामध्ये शेतीची मशागत मृदा तपासणी, पाणी व्यवस्थापन, विकसित वि-बियाणे किटकनाशके, कृषी प्रदर्शन, मेळावे, शेतकरी संघटना इत्यादीचा समावेश झालेला दिसुन येतो.

शेतीचा शाश्वत विकास आणि शेती संबधी शासनाच्या योजना कोणत्या स्वरुपात आहेत. या योजनाचा परिणाम कोणत्या स्वरुपात आहेत. याची उकल करण्या करिता प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरुन पुढीलप्रमाणे अध्ययनाची उद्दिष्टये मांडण्यात आली आहेत.



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

Associate Professor
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

**1.उद्दिष्टये (Objectives) :**

1. शाश्वत शेती संकल्पना अभ्यासणे.
2. शाश्वत शेतीविकासाचे घटक जाणून घेणे.
3. शाश्वत शेती आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
4. शेती व्यवसाया संबधी योजनांचा अभ्यास करणे.

सदरील अध्ययन उद्दिष्टांच्या पुर्तते करिता खालीलप्रमाणे गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आली आहे.

**2. गृहितके (Hypothesis) :**

1) शाश्वत शेती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
2) भारतीय शेतीला शाश्वत तांत्रिक सुविधांचा अभाव आहे.
3) शाश्वत विकसीत शेती उद्योगात शेतमालाच्या किंमतीत टोकाचा चढ-उतार आहे.
4) शाश्वत शेती विकासाला शासनाच्या योजना वरदान ठरत आहेत.

प्रस्तुत गृहितकृत्यांच्या पडताळणी करिता पुढीलप्रमाणे संशोधन पध्दतीचा आवलंब करण्यात आला आहे.

**3. संशोधन पध्दती :**

सदरील शोध निबंधाच्या अध्ययना करिता प्रामुख्याने द्वितीय स्त्रोत पध्दतीचा आवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध संदर्भग्रंथ मासिके, प्रकाशित प्रबंध, शासनाचे अहवाल, वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी करिता प्रामुख्याने वर्णनात्मक आराखडयाचा अवलंब करण्यात आला आहे.

**4. विषय विवेचन (Discussion) :**

शाश्वत शेती विकास प्रक्रिया मध्ये शेती व्यवसायाशी संबंधीत विकसीत तंत्रज्ञानाचा समावेश होतो. तर शेती संबंधी शासनाच्या योजनामध्ये माती परिक्षण, तांत्रिक अवजारे शास्त्रीय पध्दतीने शेतीमशागत, संकरीत बि-बियाणे औषध फवारणी, पाणी नियोजन उत्पादीत मालाला हमीभाव, पिकविमा, माल खरेदी विक्री योजना इत्यादीचे स्वरुप पुढीलप्रमाणे दिसून येते.

**1) प्रधानमंत्री कृषी सिचंन योजना :**

शाश्वत शेती विकासाकरिता 2015 पासून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा उद्देश शेती व्यवसाय तांत्रिक पध्दतीने करणे आणि 2022 पर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ करणे आहे. या योजनेसाठी 2,600 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या योजनेचे प्रमुख उद्दिष्टे



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

म्हणजे प्रत्येक शेती करिता पाणी उपलब्ध करणे त्याचबरोबर नदी संपर्क योजनेची कार्यक्षमतेने अंमलबजावणी करणे. प्रत्येक गावामध्ये कमीत-कमी एका जल-संग्रहण तलावाची निर्मिती करणे.

**2) प्रधानमंत्री पिक विमा योजना :**

ही योजना 13 जानेवारी 2016 पासून सुरु करण्यात आली. या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना रब्बी आणि खरिप पिकांसाठी विमा संरक्षण दिले जाते. या योजनेत भात, बाजरी, गहु, नाचणी, तुर, मुग, उडीद, हरभरा, सोयाबीन इत्यादी तृणधान्य व कडधान्य त्याचबरोबर कारळे, भुईमुग, तीळ सुर्यफुल, करडई इत्यादी गळीत धान्य आणि कापूस, कांदा या नगदी पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**3. मृदाकार्ड योजना :**

शेतीतील मृदाची तपासणीकरुन तीची गुणवता तपासुन त्यात कोणते पीक चांगल्याप्रकारे येईल. त्या पीकापासुन जास्तीत जास्त नफा शेतकऱ्यांना मिळेल या हेतुने केंद्र सरकारने 19 फेब्रुवारी 2015 मध्ये मृदा आरोग्यकार्ड योजनेचा प्रारंभ झाला. या योजनेचा उद्देश शेतकऱ्याला शेतातील मातीचे परिक्षण करुन मातीचे परिक्षण व गुणवत्ता तपासुन पिकाचे नियोजन केले जात आहे. माती परिक्षण करुन जमिनीचा पोत सुधारण्यासाठी मदत होत आहे. या मुळे शेतीतून गुणवत्तापूर्ण आणि जास्तीत जास्त उत्पादन मिळण्यास सहाय्यभूत होत आहे. शेतीची सुपिकता योग्य नसेल तर शेतीत खर्च करुन त्याचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही.

मृदा आरोग्य कार्ड योजना राबविण्याकरीता 2017 पर्यंत 10.58 कोटी मृदाकार्ड चे वितरण करण्यात आलेले आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना मृदा तपासणीची लिखीत पावती दिली जाते. त्यानुसार पुढील कार्यवाही केली जात आहे.

**4. प्रधानमंत्री किसान संपदा योजना :**

ही योजना भारत सरकारने ऑगस्ट 2017 मध्ये सुरु केली. या योजनेचा उद्देश आधुनिक यंत्र सामुग्रीच्या मदतीने कृषी व्यवसायाची मशागत, नियोजन, व्यवस्थापन आणि मुलभूत सुविधांची निर्मिती करणे आहे. आधुनिक सुविधामुळे शेतीव्यवसाय वेळेवर पूर्ण होवून उत्पादनात वाढ होईल. अधिक उत्पादनामुळे देशात खाद्य सामुग्रीची कमतरता भासनार नाही. अधिक उत्पन्नातुन शेतकऱ्यांना आर्थिक लाभ ठेवून त्यांच्या कल्पना शक्तीचा मार्ग विकसित होईल.

**5.राष्ट्रीय कृषी बाजार योजना :**

राष्ट्रीय कृषी बाजार योजना 14 एप्रिल 2016 पासून सुरु करण्यात आली . या योजनेचा उद्देश शेतकरी आणि खरेदीदार यांच्या मधील दलाल संपूष्टात आणून शेतकऱ्यांच्या शेती मालाला रास्त भाव मिळवून देणे होय. शेतकऱ्यांच्या मालाचे मापन योग्य पध्दतीने करणे. या योजनेमुळे सर्व बाजार समित्या ई-ट्रेडिंग व्यासपीठावर आणण्यात आलेल्या आहेत. देशातील प्रमुख 585 कृषी बाजार समित्या इंटरनेटने जोडण्यात



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

आलेल्या आहेत. या योजनेचा शेतकऱ्यांना फायदा म्हणजे शेतकरी आपला माल प्रत्यक्ष ग्राहकांना विकू शकतो. विक्री करिता शेतकऱ्यांवर कोणतेही बंधन नाही. शेतकऱ्यांच्या मालाचे शासनाने भाव बांधणे बंधनकारक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत आहे.

**6.राष्ट्रीय ई-शासन योजना :**

ही योजना भारत सरकाने 18 ऑगस्ट 2006 मध्ये सुरु केली. या योजनेचा उद्देश देशातील सर्वच नागरिकांना सर्वच शासकीय सेवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा माध्यमातून उपलब्ध करुन देणे आहे.

ही योजना भारत सरकारने इलेक्ट्रॉनिक विभाग माहिती तंत्रज्ञान विभाग आणि प्रशासकीय सुधारणा व जनतक्रार विभागाद्वारे बनविली आहे. या योजनेद्वारे माहिती सप्रेंषण तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रामध्ये वापर करुन कृषी विकासाला चालना देणे हा आहे. या योजनेमुळे नवनवीन माहिती तात्काळ शेतकऱ्यांना पोहचली जाते. त्याच बरोबर शेती मालाचे भाव शेतकऱ्यांच्या संदर्भातील योजना, शेतीला आर्थिक अनुदान शेती पिकांचा विमा, नवनवीन बि-बियाणे इत्यादीची माहिती शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तांत्रिक शेतीची माहिती मिळुन त्यांचा आर्थिक विकास घडुन येत आहे.

**7. सरकारी पणन संस्था :**

शेतकऱ्यांच्या मालाला शाश्वत भाव मिळावा या करिता सरकारी पणन संस्थाची निर्मिती करण्यात आली. या संस्था बाजार समित्याच्या माध्यमातुन चालतात. या संस्थाद्वारे भारत सरकारने बाजार समित्या च्या विकासावर 500 कोटी रुपये खर्च केले आहेत. त्या मागील उद्देश शेतकऱ्याच्या सहकारी संस्था निर्माण करुन उत्पादीत माल समुहाने बाजार समित्याकडे आणने होय. या संस्थामुळे शेतकरी आपला शेतीमाल बाजारपेठेपर्यंत आणुन स्वच्छेप्रमाणे विक्री करु शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देण्याकरिता सहकारी पणन संस्था वरदान ठरत आहे.

**8. कृषी कर्जासाठी व्याज अनुदान योजना :**

व्याज अनुदान योजना 2006-07 पासुन सुरु करण्यात आली. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना सार्वजनिक क्षेत्रातील बँकाकडून घेतलेल्या कर्जावर फक्त 7 टक्के व्याज द्यावा लागते. शासनाने 2009-10 पासुन जे शेतकरी अनुदाना सोबत व्याज भरणा करतील त्यांना व्याजदरात 1 टक्का सुट देण्याचे निश्चित केले आहे. तर 2010-11 पासुन ही सुट 2 टक्के करण्यात आली आहे. वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त 4 टक्के व्याजदराने लघुमुदतीचे कर्ज मिळत आहे. त्यामुळे शेतकरी शेती व्यवसायाकरिता बँकाचे अर्थ सहाय्य घेवून शेतीव्यवसाय तांत्रिक पध्दतीने करीत आहे.

**9. किसान अपघात विमा योजना :**

शेतकरी ही शेती व्यवसायाशी प्रत्यक्ष संबंधीत कार्य करीत असतो. त्यामुळे विहीर, विद्युतपंप, शेतीअवजारे, शेतमालाची ने-आण, पशुपालन, इत्यादी क्रिया पारपाडीत असताना शेतकऱ्यांचा अपघात



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

होण्याची शक्यता अधिक असते. शेतकऱ्यावर अशी वेळ येवू नये या करिता महाराष्ट्र शासनाने 2005-06 पासुन किसान अपघात विमा योजना सुरु केली आहे. ही योजना शेतीव्यवसायातील 13 प्रकारच्या अपघातांना विमा संरक्षण देण्यात आले आहे. या योजना मुळे शेतकरी शेतीव्यवसाय निसंकोच करुन अधिकअधिक उत्पादन करीत आहेत.

**10. शेतकरी स्वाभिमान योजना :**

शेतकऱ्यांना स्वाभिमानी जीवन जगता यावे त्यांना दारिद्रेपे खालुन काढता यावे. त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक विकास घडुन यावा. कोरडवाहु शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी व्यवस्थेकरीता शासनाकडुन अनुदानित विहीर शेततलाव, फळ बागाकरिता फळबाग अनुदान योजना, पशुपालनाकरिता अनुदान, दिले जात आहे. त्याच बरोबर पिक विमा, पशु विमा, फळबाग विमा इत्यादी स्वरुपाचे आर्थिक संरक्षण शेतकऱ्यांना दिले जात आहे. त्यामुळे आज शेतकरी शेती व्यवसाय करुन स्वाभिमानी जीवन जगत आहेत.

**11. शेतकरी बाजार योजना :**

महाराष्ट्र शासनाने 2 जुलै 2012 पासुन कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकरी बाजार उभारण्याचा निर्णय घेतला असुन ही योजना राबविण्यासाठी राज्यकृषी मंडळास नोडल एजन्सी म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. या योजनेची राज्यस्तरावर प्रभावी अंमलबजावणी व्हावी या करिता मंत्री महोदय, पणन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. असुन जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. हया बाजार समित्या शेती मालाला योग्य भाव मिळवून देत आहेत.

**12. दस लाख विहिर योजना :**

या योजने अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिर खोदण्याकरिता अनुदानित कर्ज दिले जाते. त्याच बरोबर सिंचन सुविधा शेती अवजारे कुकूटपालन, पशुपालन, दुग्धे व्यवसाय, कुटीर उद्योग, फळबागा, इत्यादी करिता अनुदानीत कर्ज दिले जात आहे. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना शेतीतून मोठया प्रमाणात उत्पादन काढता यावे. शेती व्यवसाया बरोबरच शेतीला जोड उद्योग निर्माण करुन देणे. या जोडउद्योगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे सबलीकरण घडून आनणे होय.

**6.संशोधन महत्त्व :**

सदरील संशोधनाच्या अध्ययनातून शाश्वत शेती विकास आणि शासनाच्या योजना यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. शेती विकासामध्ये शासकीय योजना कोणत्या प्रकारे महत्वपुर्ण भुमिका निभवित आहेत याचे स्वरुप व स्पष्टीकरण प्रामुख्याने विवेचन करण्यात आले. भारतीय कृषी विकासामधून मानव, समाज आणि राष्ट्रांचा सर्वांगिण विकास घडुन येत आहे. म्हणुन कृषी विकासाला शासन, स्वयंसेवी संस्था, बँक, पतसंस्था, सोसायटी इत्यादी कर्ज पुरवठा करीत आहेत. हे दिसुन आले.



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
**Special Issue on *"Sustainable Development Goals"***

**7. सारांश :**

आधुनिक शेतकरी कृषी व्यवसायामध्ये नवनवीन तांत्रिक सामुग्रीचा अवलंब करीत आहे. त्याच बरोबर आधुनिक पिक लागवड पध्दतीचा अवलंब करुन अधिकाधिक उत्पादन काढत आहेत. शेती विकासाच्या दृष्टीकोनातून शेती संबंध कृषी तंज्ञांचे मार्गदर्शन, कृषी मेळावे, कृषी प्रशिक्षण इत्यादीचा अवलंब केला जात आहे.

**8.संदर्भसूची:**

[1] डॉ.प्रदिप आगलावे-सामाजिक संशोधन पध्दती, साई प्रकाशन नागपूर 2007.
[2] डॉ.दा.धो काचोळे- समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद 2009.
[3] डॉ.वसुधा पुरोहित-कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.
[4] जयप्रकाश मिश्रा-कृषी अर्थशास्त्र, साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा 2007.
[5] योजना ससिक जुन 2018.
[6] लोकराज्य मासिक मे. 2017.
[7] डॉ.विजय कवीमंडन-कृषि व ग्रामीण अर्थशास्त्र
[8] योजना मासिक डिसें.2014.
[9] www.india.gov.in <http://www.india.gov.in>
[10] एस.बी.सवदी-कृषी भूगोल,निराली प्रकाशन आग्रा.

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

# शाश्वत विकासातील धोक्याचे व्यवस्थापन

**प्रा. डॉ. अर्जुन मोरे**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*
*वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर*
*Email: drmoream@rediffmail.com*

*संक्षिप्त गोषवारा (Abstract) :*

वेगवान अशा आर्थिक प्रगतीच्या दिशेने आपला प्रवास सुरु झाला आहे. या प्रवासाला अधिक गती देण्याच्या दृष्टीने नवनवीन योजनांचा पुढाकार घेतला जात आहे. भारतीय बनावटीचे कार्यक्रम, कौशल्य भारत, डिजिटल भारत, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट शहरे आदींचा यात समावेश आहे. येत्या एक दिड दशकात सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी केलेला खर्च हा सार्वजनिक तसेच खाजगी गुंतवणुकीच्या माध्यमातून गेल्या चार ते पाच दशकामध्ये केलेल्या गुंतवणुकीपेक्षा अधिक होईल असे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण होणार नाही. विकासाच्या अंमलबजावणी करीता नियोजनाच्या त्याचप्रमाणे डिझायनिंग करीताही आपल्याला ही योग्य संधी आहे. योग्य नियोजनाअंती धोक्याची तीव्रता कमी करता येऊ शकते. त्या प्रमाणे दुर्दैवान घडलेल्या आपत्ती सुसह्य होऊ शकतात.

**Keywords: शाश्वत विकास, धोक्याचे व्यवस्थापन**

## 01) प्रस्तावना Introduction :

भारत व जग एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातून मार्गक्रमण करत आहे. आपला पुढील भविष्यकाळ अनेक दृष्टीने अत्यंत उज्वल व आधुनिक जीवन शैलीचा असणार आहे. कारण जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, अवकाश संशोधनात झालेली प्रगती, वैज्ञानिक क्षेत्रातील आधुनिक प्रगती यामुळे जग खुप जवळ येऊन ठेपले आहे. त्यामुळे मानवी जीवन सुलभ व समृध्द करण्याच्या दृष्टीने नेत्रदीपक प्रयत्न होतांना दिसून येतात. पण दुसऱ्या बाजूने विचार करता शाश्वत विकास साधत असताना काही घटना, दृष्य, भयाण - भेसूर, रुपाने दृष्टिपथास पडतात व तशा त्या अनुभवासही येत आहेत. कारण भूकंप, ज्वालामुखी, पुर, कोरडा दुष्काळ, भूमिपात, वादळे, सागरी लाटा, त्सुनामी, अपघात, वातावरणातील बदल, वाढते तापमान, ओझोन चा क्षय, हरीतगृह परिणाम, या सारख्या नैसर्गिक व वातावरणीय आपत्ती तर वाळवंटीकरण, युध्द, दहशतवाद, वाढती लोकसंख्या, या मानव निर्मित आपत्ती आणि टोळधाड सारख्या जैविक जीवित आपत्ती शाश्वत विकासातील मोठे अडथळे असल्याने एका परिने मानवी जीवनाचे भवितव्यच नव्हे तर त्यांचे अस्तित्वच धोक्यात येण्याची भिती निर्माण झाली आहे.



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

Assistant Professor
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist. Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

या भयाण परिस्थितीमुळे विचारवंत, शास्त्रज्ञ, जागतिक संघटना, शासन, समाज व प्रत्येक सुजान नागरिक शाश्वत विकास साधतांना वसुंधरेच्या अस्तित्वा विषयी काळजी करु लागला आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'शाश्वत विकासातील धोक्याचे व्यवस्थापन' महत्वाचे मानले जाते.

**02) उद्दिष्टये Objective:**

1) शास्त्रोक्तरित्या नैसर्गिक व मानवी आपत्तीचे पृथक्करण करुन माहिती घेणे.
2) 2015 गतीशिलता अभ्यासणे.
3) भारतासमोरील आव्हाने आणि संधीचा शोध घेणे.
4) त्या अनुषंगाने योग्य त्या उपाय योजना करण्यासाठी पुढाकार घेणे.

**03) बीज संज्ञा Key words :**

आपत्ती
व्यवस्थापन
**शाश्वत - विकास**

**04) संशोधन पध्दती Methodology:**

सदरील शोध निबंधाचा अभ्यास करण्यासाठी विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ व विविध स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या माहितीचे संकलन करुन तिचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**05) विषय विवेचन Discussion :**

साधारणपणे निसर्गाकडे साधन संपत्तीचा मुळस्त्रोत किंवा निर्माता म्हणून पाहिले जाते. परंतु निसर्ग चक्रात अनेक अद्भूत घटना घडत असतात. ज्यामुळे भूपृष्ठावर उत्पात किंवा आपत्ती कोसळून क्षणात प्रचंड उलथा पालथ घडून येते. मग ही आपत्ती निसर्ग निर्मित असो वा मानव निर्मित. आपत्ती व्यवस्थापन या संकल्पनेत आपत्तीजनक, धोकादायक घटनांचे व्यवस्थापन असा अर्थ अपेक्षित आहे. धोका व्यवस्थापनाचा मुख्य हेतूच हा आहे कि, संकटातील अधोरेखित तीव्रता पाहणे, शास्त्रोक्तरित्या नैसर्गिक किंवा मानवी आपत्तीचे पृथःक्करण करुन माहिती घेणे, त्या अनुषंगाने योग्य ती उपाय योजना करण्यासाठी पुढाकार घेणे होय. याचा दुसरा अर्थ असाही आहे की, संरचनात्मक आणि गैरसंरचनात्मक ( स्ट्रक्चरल आणि नॉनस्ट्रक्चरल) उपाय योजनांव्दारे अस्तित्वात असलेल्या धोक्याचे प्रमाण कमी करणे. यामध्ये नाविण्यपूर्ण तंत्राचा आणि जोखिम विम्याचा अंतर्भाव करणे. ज्या ठिकाणी धोका टाळू शकत नाही, कमी करु शकत नाही किंवा विमा उतरविणे



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

सुध्दा अशक्य आहे. अशावेळी पर्याय नसेल तर सामोरे जाणे, आपत्तीचा सामना करणे म्हणजे पूर्ण तयारीनिशी प्रतिसाद देणे. परिणामकारक प्रतिसाद म्हणजे जेव्हा केंव्हा, आपत्ती येईल तेंव्हा तेंव्हा मनुष्यहानी टाळणे, लोकांना भोगायला लागणाऱ्या यातना कमी करण्याचा अटोकाट प्रयत्न करणे होय. यात लोकांना सुरक्षित स्थळी हालवणे, शोध आणि बचाव व मदत कार्य हातीन्मदा घेणे, लोकांच्या निवाऱ्याची सोय करणे, त्यांना दिलासा देणे ही कामे अंतर्भूत असतात. अशाच तयारीचा पुढील टप्पा म्हणजे, या करिता असलेले धोरण, नियमावली त्याच बरोबर सुयोग्य प्रकारे जीवनमानाची उभारणी करणे, आपत्ती दरम्यान कधी कुणाचे सर्वस्वही गमावले जाते. म्हणून शाश्वत विकासाच्या मार्गात आपत्ती आणि धोका व्यवस्थापनाचे महत्व अनन्यसाधारण आहे. कारण अनेकविध उपाय योजून सुध्दा आपत्तीमुळे होणारे नुकसान आणि हानी अनेक प्रकारे वृध्दींगत होते. डिझास्टर रिडक्शन किंवा आपत्ती कपात या संयुक्त राष्ट्राच्या कार्यालयाने दिलेल्या अंदाजानुसार मागील दोन दशकात 1.3 दशलक्ष इतकी मनुष्यहानी झाली आहे. सुमारे 4.4 अब्ज लोक विस्थापित होवून 2 ट्रिलियन डॉलर्स आपत्तीमुळे खर्ची पडले आहेत. मागील दिडवर्षात यात आणखी मोठी भर पडली आहे.

या नुकसान आणि हानीचा भारत ही बळी आहे. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार नव्वदीच्या दशकाच्या उत्तरार्धात आणि या शतकाच्या सुरुवातीला भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या 2% पेक्षा जास्त नुकसान झाले आहे. दुसरीकडे या नुकसाना इतकी रक्कम आपण सार्वजनिक आरोग्यासाठी खर्च करु शकलो नाही.

**1) आपत्ती आणि विकास :**

आपत्ती आणि विकास यांचा त्रिमितीय संबंध आहे. दशकानुदशके केलेला विकास एखादी आपत्ती क्षणार्धात फस्त करुन टाकते. दुसरे म्हणजे विकासाचा अभाव कमकुवत समाजाला आपत्तीच्या धोक्यामध्ये जखडून टाकतो. तिसरे म्हणजे विकास आपत्तीच्या नव्या धोक्यांना जन्माला घालतो. उदा. गृहनिर्माण आणि पायाभुत सोयीमध्ये कायद्याची योग्य ती पूर्तता न केल्याने या सोयी अधिक संवेदनशील बनतात. खाणकाम आणि उद्योगक्षेत्रे संवेदनशील परिस्थितीमध्ये उभारल्याने पर्यावरणाला धोका संभवतो. त्याच प्रमाणे खनिज तेलावर आधारीत मालाचे उत्पादन आणि ग्रहण हवामानाच्या धोक्यांना आमंत्रण देतात.

**2) गतिशीलता (2015):**

2015 हे वर्ष फारच महत्वाचे मानावे लागेल. कारण या वर्षात तीन महत्वाचे जागतिक करार झाले. शाश्वत विकास लक्ष्ये ( एस डी जी.), हवामान बदला संदर्भातील पॅरिस करार - कॉप - 21 आणि आपत्ती जोखीम कपाती विषयी चा सेंदाई (जपान) आराखडा 2015-30 आंतरराष्ट्रीय समुदायांनी या तीन्ही करारात निर्धारीत करण्यात आलेली उद्दिष्टये व लक्ष साध्य करण्यासाठी भारताने वचनबध्दता म्हणून नोव्हेंबर 2016



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

मध्ये आपत्ती कमी करण्याबाबतच्या आशियाई मंत्री परिषदेचे नवी दिल्ली येथे आयोजन केले होते. या संदर्भ आराखडयाच्या आरंभी प्रथम : प्रयत्नपूर्वक काही करता येतील अशी आपत्ती व धोके व्यवस्थापनातील सात उद्दिष्टये निश्चित करण्यात आली. यामध्ये, आपत्तीतील मोठया प्रमाणात होणारी मनुष्यहानी टाळणे, आपत्ती ग्रस्तांचे प्रमाण कमी करणे, होणारे आर्थिक नुकसान टाळणे, त्यांच्या सुविधांना कमीत कमी हानी पोहचेल यासाठी प्रयत्न करणे इत्यादी. त्याच बरोबर अनेकविध अंगानी होणाऱ्या आपत्तीसाठी पूर्वसुचना देणे आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी आंतरराष्ट्रीय मदत घेणे, यानुसार आपत्तीमधील धोके कमी करण्यासाठी चार टप्प्यावर प्राधान्य द्यायला हवे. यामुळे स्थानिक, राष्ट्रीय विभागीय तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर आपत्तीतील जोखीमेमध्ये कपात होईल. त्यानुसार यात खालिल बाबींचा समावेश होतो. अ) आपत्तीमधील धोके समजावून घेणे ब) स्थिती पूर्वपदावर आणण्याकरिता, आपत्ती व धोके कमी करण्याकरिता आपती धोके व्यवस्थापनात गुंतवणुक करणे. क) धोके काबुत ठेवण्याकरीता धोके व्यवस्थापन सक्षम करणे. ड) पुनर्वसन, पुनर्बांधणी, प्रतिसाद आणि पुनर्लाभ यांच्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करणे..

संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 2030 साला पर्यंतचा शाश्वत विकासाचा कार्यक्रम सप्टेंबर 2015 मध्ये स्विकारला आहे. या कार्यक्रमातर्गत आपत्ती केंद्रविषय मानून एकुण 17 पैकी 8 शाश्वत विकासाच्या लक्ष्यांमधून त्यांच्याव्दारे विविध क्षेत्रामध्ये आपत्ती संदर्भातील स्थिती पूर्व पदावर कशी आणता येईल याचा विचार केला आहे.

| शाश्वत विकासाची उद्दिष्टये | आपत्तीतील धोके भरुन काढण्याबद्दलची लक्ष्ये |
|---|---|
| उद्दिष्ये क्र. 1. सर्व प्रकारची गरीबी निर्मुलन | लक्ष 1.5 : हवामानविषयक तीव्र आपत्तीसम घटनांचा गरीबांवर होणाऱ्या परिणामात घट होईल. |
| उद्दिष्टये क्र.2. भूकबळींना पूर्णविराम देणे, सर्वतोपरी अन्नसुरक्षा पुरवणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे. | लक्ष 2.4 : हवामान बद्दल, स्विकारण्यासाठी क्षमता वृध्दी करणे. उदा. दुष्काळ, पुर, आणि इतर नैसर्गिक आपत्ती |
| उद्दिष्टये क्र. 3. उत्तम आरोग्याची हमी देणे. | लक्ष 3. 6 : पूर्व सुचना देऊन जीवीत हानी रोखणे. |
| उद्दिष्टये क्र. 4. सर्व समावेशक आणि समान दर्जाच्या आग्रह आणि हमी देणे. | लक्ष 4. अ : आपत्ती मधून बचाव होण्यासाठी शैक्षणिक सुविधांची उभारणी करणे. |



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

| | |
|---|---|
| उद्दिष्ये क्र. 5. पुर्नस्थापना करता येईल अशा पायाभूत संरचनेची बांधणी करणे. | लक्ष 9. 1 : विकासाचा दर्जा वाढवणे, त्याचप्रमाणे पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि आपत्तीमध्ये पुनस्थापना करणे. |
| उद्दिष्ये क्र. 6. शहरे आणि मानव सुरक्षित आणि शाश्वत राखणे. | लक्ष 11. 5 : आपत्ती मध्ये होणारी जीवित तथा वित्तहानी न होण्याचे दिशेने प्रयत्न करणे. |
| उद्दिष्ये क्र. 7. हवामान बदल आणि परिणामांच्या अनुशंगाने लक्ष देणे. | लक्ष 13. 1 : हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तीना स्विकारण्याकरीता तथा त्यामुळे झालेली झिज भरून काढण्याकरिता क्षमता वाढवणे. |
| उद्दिष्ये क्र. 8. जमिनीची धूप भरुन काढणे. | लक्ष 1. 5 पूर तसेच दुष्काळ स्थितीने खालावलेल्या जमिनीची काळजी घेणे. |

डिसेंबर 2015 मध्ये स्विकारलेल्या पॅरिस येथील हवामान विषयक करारामध्ये आपत्ती व्यवस्थापनाविषयी व्यापक विचार झाला. तो समजून घेणे, कृती करणे, आणि सहाय्यता देणे या विचाराच्या विस्ताराकरिता ज्या बाबी आहेत त्यात 1) लवकरात लवकर जागृत करण्याची प्रणाली 2) संकट काळासाठी तयारी 3) स्लो ऑनसेट इव्हेंट्स 4) कायम स्वरुपी होणाऱ्या नुकसानीच्या घटनांचा विचार करणे 5) धोक्याची व्यापक प्रमाणातील छाननी आणि व्यवस्थापन 6) धोक्याच्या विमा विषयक सवलती, हवामान विषयक असलेला धोका, त्याच्या अनुषंगाने विमाविषयक धोरण 7) गैरआर्थिक नुकसान 8) समाजाचे जीविताचे,त्याचेप्रमाणे पर्यावरणाच्या पुर्नस्थापनेचे प्रयत्न.

### 3) भारतासमोरील आव्हाने आणि संधी :

2015 च्या आंतरराष्ट्रीय कराराच्या वेळी तो पूर्णत्वास नेण्यासाठी भारताने महत्वाची भुमिका बजावलेली आहे. आपण लोकसंख्येच्या दृष्टीने जगात दुसरे आहोत. आपण वेगाने वाढणारी मोठी आर्थिक शक्ती आहोत. जागतिक स्तरानुकूल विचार केल्यास आपला उगवती अर्थशक्ती म्हणून सहावा क्रमांक लागतो. याच बरोबर आपण दारिद्र्याचे व्यापक प्रमाण असलेला देश आहोत. आपल्याकडे बालकांचे कुपोषण व प्रौढांची निरक्षरता आहे. यावरुन लक्षात येईल की, भारतामध्ये आपला शाश्वत विकास आणि आपत्तीचे पुनर्स्थापन करण्याची क्षमता आहे. जागतिक दृष्टया ह्या संदर्भातील लक्ष गाठण्याचे सुत्र भारताकडे आहे. भारताने आपल्या विधिविषयक त्याचप्रमाणे संस्थात्मक तंत्राने विविध स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे. आपत्ती आणि धोके व्यवस्थापनामध्ये आपण शास्त्रोक्त आणि तांत्रिक सिध्दता प्रदर्शित करत आहोत. त्याचे दृष्य परिणाम



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

मनुष्यहानी वाचवण्यात, नुकसान कमी करण्यात दिसत आहेत. हवामान विषयक धोक्यामध्ये अपेक्षित परिणाम दिसून आले. उदा. भीषण वादळे, (फेकिन व हुडहुड) मात्र हेच परिणाम जल आधारीत आपत्तीमध्ये दिसून आले नाहीत. याची उदाहरणे म्हणजे उत्तराखंड, श्रीनगर, चेन्नई, केरळ येथे आलेली पुरस्थिती व ढगफुटी इ. किंवा भौगोलिक आपत्ती उदा. भूस्खलन (माळीन आणि उ. सिक्किम ) इतकेच काय तर तंत्रज्ञानावर आधारीत आपत्ती उदा. औद्योगिक तसेच रस्ते अपघाताचे व्यापक प्रमाण, जैविक आपत्तीच्या धोक्यामध्ये मोठया प्रमाणावर पसरणाऱ्या रोगांच्या साथी, त्याच बरोबर पर्यावरणीय आपत्तीमध्ये दुषित पाण्याचा प्रश्न, वाढते वायू प्रदुषण, वाढत्या शहरीकरणाचेही गंभीर परिणाम दिसू लागले आहेत. 2001 मध्ये भूज येथील भूकंपानंतर देखील भूकंपासारख्या आपत्तीचे निवारण करण्याची क्षमता भारताने अजून सिध्द केली नाही. या संदर्भात जास्त घनता असलेल्या शहरी विभागामध्ये एखादा भूकंप झाला तर ते महासंकट ठरेल असा इशारा या क्षेत्रातील तज्ञ देत आहेत.

नैसर्गिक असो वा मानवी धोके निवारणासंबंधी भारतात पारंपारिक ज्ञान समजउमज त्याच प्रमाणे शास्त्रोक्त ज्ञानाचाही भरपुर साठा आहे. परंतु अशा ज्ञानाचा उपयोग, यासंबंधीचे कार्यक्रम ठरविताना पुरेपुर होतोच असे नाही. तीच गोष्ट सामाजिक तसेच आर्थिक विकासाचे धोरण राबवितांना घडते. कृतिआराखडा किंवा प्रकल्प राबवितांना हाच अनुभव येता. या विविध प्रकल्पाच्या माध्यमातून आपत्ती, धोके, यामध्ये कमतरता आली असली तरी याचा पुरेसा फायदा अद्यापि झालेला दिसत नाही. किंबहुना यातील काही प्रकल्प प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या नवनवीन धोक्यांसाठीच्या समस्या निर्माण करत आहेत.

सर्व प्रकारच्या विकासाच्या प्रमुख प्रवाहात आपत्ती व धोके यांचे प्रमाण कमी राखणे हा आपत्ती व्यवस्थापनातील प्रमुख कार्यक्रम असतो. अशा प्रकारचा कार्यक्रम जरी हाती घेतलेला असला तरी या दिशेने लक्ष्यवेधी कार्य अद्याप झालेले नाही. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण असो की, केंद्राचे किंवा राज्याचे विभागीय मंत्रालय, आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने यांनी मार्गदर्शक तत्वे जारी केलेली दिसत नाहीत किंवा जरी जारी केली असली तरी त्यांचे प्रभावीपणे अंमलबजावणी होतांना दिसत नाही. कोणताही कृती आराखडाही अद्याप तयार केलेला दिसत नाही. वेगवेगळया क्षेत्रात आपत्ती नंतर पुनर्स्थापन होणे महत्वाचे आहे.

सेंदई आराखडयाच्या अंतर्गत शाश्वत विकासाची लक्ष्यपुर्ती करणे तसेच पॅरिस येथील हवामान विषयक धोरणांची पूर्तता या बांबीकडे आपले नक्कीच दुर्लक्ष झाले आहे. आता मात्र आपत्ती व धोके व्यवस्थापनाच्या दृष्टीने आपल्याला हे आव्हान म्हणून स्विकारावे लागेल शिवाय ही एक संधी देखील आहे.



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**6) निष्कर्ष आणि उपाय Conclusion & Suggestion :**

1) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केंद्र व राज्य सरकारांशी सल्लामसलत करुन, कृती आराखडा तयार करून त्याची योग्यरित्या अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.
2) हवामान विषयक धोक्यात ( भीषण वादळे - फेलिन व हुडहुड ) अपेक्षित परिणाम ( पूर्वसूचनामुळे आपत्तीचा धोका कमी) दिसून आले. तसे जल आधारीत आपत्तीमध्ये (पुर व दुष्काळ ) दिसून आले नाहीत. यावर संशोधन होण्यासाठी तशी सक्षम यंत्रणा तयार करण्याची आवश्यकता आहे.
3) देशाचा शाश्वत विकास साधतांना विविध आवाहानांचा शोध घेवून, तंत्रज्ञावरील आधारीत विविध संधी देशाच्या कानाकोपऱ्यात पसरविण्यांचे प्रयत्न झाले पाहिजे.
4) सार्वजनिक पध्दतीने विमा उतरविणे आणि पर्याय नसल्यास आपत्तीचा सामना करण्याची पूर्ण तयारी ठेवणारी यंत्रणा उभी करणे महत्वाचे आहे.

**10) संदर्भ सूची Reference Book:**

[1] डॉ. वराट, डॉ. अलिझाड- 'पर्यावरणशास्त्र' - रेणुका प्रकाशन औरंगाबाद, पृष्ठ 196,197
[2] डॉ.एस.डी.वाघमारे- 'नैसर्गिक आपत्तीचा भूगोल' - शौर्य पब्लिकेशन लातूर, पृष्ठ 3
[3] प्रा. ए. पी. चौधरी - 'आपत्ती व्यवस्थापन' - प्रशांत पब्लिकेशन - जळगाव, पृष्ठ 195, 222
[4] डॉ. विठ्ठल धारपुरे - 'पर्यावरण भूगोलशास्त्र' - पिंपळापुरे अॅन्ड कंपनी पब्लिकेशन औरंगाबाद, पृष्ठ 122, 200
[5] 'योजना' - जानेवारी 2018, पृष्ठ 10, 35 6) वृत्तपत्रे, वृत्त वाहिण्या वरून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे.
[6] w.w.w. google, Wikipedia.com

PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

EDUINDEX

## PUBLICATION CERTIFICATE

This publication certificate has been issued to

*Dr. Arjun More*

For publication of research paper titled

*Impact Of GST On The Indian Economy*

Published in

*Studies in Indian Place Names with ISSN no. 2394-3114*

Vol: *40* issue: *17* Month: *February* Year: *2020*

Impact factor: *6.3*

The journal is indexed, peer reviewed and listed in UGC Care

Editor

Eduindex Journals

www.eduindex.org
editor@eduindex.org

Note: This eCertificate is valid with published papers and the paper must be available online at the website under the network of EDUindex. For cross check you can contact at editor@eduindex.org

Vasundhara Arts & Science College, GHATNANDUR

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519

Assistant Professor
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist. Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "*Sustainable Development Goals*"

# आर्थिक विकासात महिला बचतगटाचे योगदान

**प्रा.डॉ.अर्जुन मोहनराव मोरे**
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*
*वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर*
*Email:drmoream@rediffmail.com*

*गोषवारा (Abstract):*
बचतगट महिलांचे सक्षमीकरण आणि समाजातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करून राष्ट्रीय आर्थिक उत्पादन वाढवण्याचे माध्यम आहे. बचतगटाला शासकिय निम्मशासकिय संस्था, स्वंयसेवी व सेवाभावी संस्था, राष्ट्रीयकृत बँका इत्यादींच्या माध्यमातून उद्योग, धंद्याकरीता कमी व्याजदराने कर्ज दिले जात आहे. अर्थात बचतगट उद्योगशीलतेला मदत व चालना देणारी आणि बचतीतून कर्जफेड करणारी चळवळ आहे. बचतगटाच्या चळवळीमुळे गरीबी व दारिद्र्य निवारण्यास मदत होत आहे. तसेच स्त्री-पुरूष समानतेला चालना मिळत आहे. गरीबांना आर्थिक सुविधा मिळविण्याचा अधिकार प्राप्त होत आहे. बचत गटाच्या लघु अर्थ पुरवठा चळवळीमुळे लोकशाहीची तत्वे तळागाळापर्यंत रूजवण्याची प्रक्रिया घडून येत आहे.

**Keywords: आर्थिक विकास, महिला बचतगट**

**प्रस्तावना (Introduction) :**

राष्ट्रीय आर्थिक विकास प्रामुख्याने विविध घटकातून होणाऱ्या उत्पादनाचे फलित स्वरूप असते. यामध्ये औद्योगिक उत्पादन, कृषिउत्पादन लघु व कुटीर उद्योग इत्यादी उत्पादन प्रक्रियांचा समावेश होतो. उत्पादन प्रक्रियेच्या पुर्णतेकरीता महिला आणि पुरूष यांच्या श्रम शक्तीची आवश्यकता असते. ही श्रमशक्तीची आवश्यकता पूर्ण करणे महिलांचा उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घेणे, महिलांना आर्थीक बचतीची सवय लावणे, आर्थिक बचतीतून महिला उद्योग व व्यवसायाची स्थापना करणे, उद्योग व्यवसायातुन महिलांना ' स्व ' अस्तित्वाची व कृतत्वाची जाणिव करून देणे, त्यांचा कौटुंबिक, वैवाहिक, सामाजिक, आर्थिक दर्जा उंचावुन राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीकोणातून बांग्लादेशाचे अर्थशास्त्राचे अध्यापक व ग्रामीण बँकेचे प्रणेते. जागतिक शांतता नोबेल पुरस्काराचे मानकरी प्रा.डॉ. महंमद युनुस यांनी प्रथम स्वयंसहाय्यता बचत गटाची मुहर्त मेढ रोवली.

**स्वयंसहाय्यता बचतगटाचा अर्थ व व्याख्या :-**

समान सामाजिक व आर्थिक परिस्थिती असलेले आणि निश्चीत स्वरूपाच्या उद्दीष्टांच्या पुर्ततेकरीता व परस्पर फायद्यासाठी स्वइच्छेने एकत्र आलेल्या लोकांचा समुह म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय. तर समान



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

OUR HERITAGE
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on "Sustainable Development Goals"

उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरीता आर्थिक बचतीच्या गुंतवणूकीच्या माध्यमातून एकत्रीत आलेल्या व्यक्तींनी स्थापन केलेल्या गटास बचतगट असे म्हणतात. आधुनिक काळात बचतगटाच्या माध्यमातून महिलांनी स्वत:चे लघुउद्योग सुरू केले आहेत. शासन बचतगटाला व्यवसायीक अनुदान कर्ज देत आहे. त्यामुळे महिला बचतगटाद्वारे शासनाच्या आर्थिक योजनांचा लाभ घेवून आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होत असून त्यांचा आर्थिक दर्जा उंचावलेला दिसून येत आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरणाबरोबरच राष्ट्रीय आर्थिक विकास घडून येत असलेला दिसून येतो. याची पडताळणी करण्याकरीता प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनाकरीता पुढील प्रमाणे उद्दीष्टांची मांडणी करण्यात आली आहे.

**2) उद्दिष्ट्ये (Objectives) :**

1) बचतगटाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे

2) बचतगटाची रचना आणि उद्दिष्ट्ये समजुन घेणे

3) बचतगटाद्वारे सुरू केलेल्या व्यवसायांचा आढावा घेणे.

सदरील उद्दिष्टांच्या पुर्ततेकरीता खालील प्रमाणे गृहितके मांडण्यात आली आहेत.

**3) गृहितके (Hypothesis) :**

1) महिलांना आर्थिक बचतीची सवयी बचतगटामुळे झाली आहे.

2) बचतगटाच्या माध्यमातून महिलांनी नवनविन उद्योग व व्यवसाय सुरू केले आहेत.

3) महिला बचतगटाच्या उद्योग व व्यवसायातुन राष्ट्रीय प्रस्तुत गृहितकृत्यांच्या पडताळणीकरीता पुढील प्रमाणे संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**4) संशोधन पध्दती (Methodology) :**

सदरील संशोधन विषयाच्या अध्ययनाकरीता प्रामुख्याने द्वितीय स्त्रोत चा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, शासनाचे प्रकाशीत अहवाल. प्रकाशीत व अप्रकाशीत प्रबंध, मासिके, वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेट इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंधाच्या मांडणी करीता वर्णनात्मक आराखड्याचा अवलंब केला आहे.

**5) विषय विवेचन (Discussion) :**

महिला बचतगट ही अर्थिक बचतीच्या माध्यमातून समान सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या महिला स्वत:च्या इच्छेने आपले हीत व गरज ओळखुन बचत गटाची स्थापना करतात, बचत गटाच्या आर्थिक बचतेतून कौटुंबिक, आर्थिक अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करतात. बचतगट हे महिलांना एकत्र येण्याचे माध्यम असून त्यातून महिलात विचार प्रकट करण्याचे मनोधैर्य निर्माण होते. त्याच बरोबर महिलात निर्णयक्षमता, कार्याचे नियोजन, व्यवहारीक ज्ञान, आर्थिक व्यवहाराची क्षमता, महिलात निर्माण होतात. म्हणून महिला सक्षमीकरणात बचत गटाचे स्थान श्रेष्ठ असलेले दिसून येते.



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

बचतगटाच्या माध्यमातून महिला करीत असलेल्या विविध व्यावसाय आणि व्यावसायातुन मिळत असलेले आर्थिक उत्पन्नाचे स्वरूप पुढील प्रमाणे दिसून येते.

**1) शेती व्यवसाय :**

बचतगटाच्या महिला कोरडवाहु अथवा बागायती शेती भाडेतत्वावर घेत आहेत. कोरडवाहु शेतीत कापूस, तूर, उडीद, मुग, तीळ हरभरा, जवस, करडई इत्यादी पिके घेत आहेत. तर बागाईती शेतीत पालेभाज्या, हळद, मीरची, अद्रक, लसुन, कोथींबीर, उस, कापूस, गहु इत्यादी पिके घेत आहेत. या उत्पादनातून महिलांना रोजगाराची निर्मिती आणि आर्थिक नफा होत आहे. यामुळे त्या आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होत असून त्यांचा कौटूंबिक, सामाजिक दर्जा उंचावत आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत आहे.

**2) शासकीय योजनांचे कार्य :**

महिला बचतगट अंगणवाडी, आरोग्य केंद्र यांना आहार पुरवठा करीत आहेत. त्याचबरोबर रॉकेल विक्री, स्वस्त धान्य दुकान धान्यवाटप, पाळणागृह इत्यादी शासनाच्या योजना चालवित आहेत. या योजनातुन महिलांना रोजगार आणि गुंतवणूकीवर नफा मिळत आहे. त्यामुळे बचतगटाच्या महिलांचे आर्थिक, उत्पन्न वाढले आहे. तर बँक, पतसंस्था, पोस्ट ऑफीस, सोसायटी, इत्यादीमध्ये आर्थिक बचत करीत आहेत. शासनाच्या योजना बचत गटामार्फत राबविल्यामुळे योजनामध्ये भ्रष्टाचार होत नाही.

**3) पशुपालन व दुग्धव्यवसाय :**

महिला बचतगट आर्थिक गुंतवणूक करून गाय, म्हशी, खरेदी करून दुग्ध व्यवसाय करीत आहेत. त्याच बरोबर शेळीपालन, वराह पालन, कुकुटपालन, मच्छीपालन करीत आहेत. या दुग्धव्यावसाय आणि पशुपालनातून महिलांना निश्चित रोजगाराची निर्मिती आणि आर्थिक नफा होत आहे. महिलांना स्वत:चे आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले असल्यामुळे त्यांना बँक, पतसंस्था, सोसायटी, मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करीत आहेत. बचत गटाच्या महिलामध्ये आर्थिक व्यवहाराचे धैर्य आणि व्यवसायाची जिद्द निर्माण झाल्यामुळे राष्ट्राच्या आर्थिक उत्पन्नाला गती प्राप्त झाली आहे.

**4) कुटीर उद्योग :**

आज बचतगटाच्या माध्यमातुन महिला कच्चा माल खरेदी करून त्याचे पक्या मालात रूपांतर करून पक्या मालाच्या विक्रीतून आर्थिक नफा मिळवित आहेत. त्यामध्ये, मिरची पावडर तयार करणे, हळद पावडर तयार करणे, लोणंच, पापड तयार करणे, मसाले तयार करणे, शोभेच्या वस्तु तयार करणे, तयार केलेला पक्का माल त्या प्रत्यक्ष ग्राहक दुकानदार यांना विक्री करतात. त्यामुळे दलाली, हमाली



PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

बराच खर्च वाचतो या कुटीर उद्योगातून राष्ट्रीय उत्पादनाला चालना तर महिलांना रोजगाराची सुविधा घडुन येत आहे.

**5) दुकानदारी व्यवसाय :**

बचतगटाच्या माध्यमातून महिला किराणा इलेक्ट्रीकल स्वरूपाच्या दुकानांची उभारणी करीत आहेत. या दुकानदारी व्यवसायातून महिलांना रोजगाराची उपलब्धता व आर्थिक गुंतवणूकीवर योग्य प्रमाणात नफा मिळत आहे. रोजगार व नफा यामुळे बचतगटाच्या महिलांचे आर्थिक स्वावलंबन घडुन येत आहे. तर उद्योग, व्यावसाय, व्यापार यांना बचत गटामुळे चालना मिळुन राष्ट्रीय आर्थिक विकास घडुन येत आहे.

**6) व्यापार :**

बचत गटाच्या महिला संघटित आर्थिक गुंतवणुकीत फळे, पालीभाज्यांचा व्यवसाय करीत आहेत. त्याच बरोबर कपडे, सौंदर्यप्रसाधने, कडधान्य, डाळी, दुध व तुप विक्री मसाले, इत्यादी स्वरूपाचे व्यापार करीत आहेत. या व्यापारातून महिलांना रोजगाराची निर्मिती झाली आहे. तर आर्थिक गुंतवणूकीवर चांगला नफा मिळत आहे. रोजगार व नफा मिळाल्यामुळे महिलांचे आर्थिक दृष्टीने सबलीकरण घडुन येत आहे.

**7) महिलांचे सबलीकरण :**

बचतगटाच्या माध्यमातून, महिला व्यापार, व्यवसाय, उद्योगाकरीता कुटूंबाबाहेर पडत आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र कुटुंबापुरतेच मर्यादित न राहता विस्तृत होत आहे. आज महिला मध्ये उद्योग व्यवसायाविषयी आत्मविश्वास वृध्दीगत होत आहे. व्यवसायाच्या माध्यमातून त्यांचा ग्राहक व्यापारी बँक कर्मचारी, स्वयंसेवी व सेवाभावी संस्थांचे पद अधिकारी इत्यादी बरोबर संबंध येत असल्यामुळे वकृत्व विचारांची मांडणी योजना आणि आर्थिक गुंतवणूक या विषयी महिलांच्या ज्ञानात भर पडत आहे. त्यांच्यामध्ये उद्योगशील दृष्टी आणि व्यवसायीक नेतृत्वाचा गुण विकसीत होत आहे. महिलांचे सक्षमीकरण होत असल्यामुळे त्यांना कुटूंबाच्या निर्णय प्रक्रियेत, सहभागी करून घेतले जात आहे. कुटूंबात त्यांच्या मत व विचारांना महत्व प्राप्त होत आहे.

**8) बचतगटाला अर्थसहाय्य करणाऱ्या संस्था :**

बचतगटाला व्यवसायाकरीता आर्थिक नियोजन महिला सदस्य स्वत:ची गुंतवणूक करतात. त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप आणि आर्थिक उलाढाल पाहून व्यवसायाकरीता स्वयंसेवी संस्था सेवाभावी संस्था, पतसंस्था, सोसायटी शासकिय बँक इत्यादी अल्प दराने कर्ज पुरवठा करीत आहेत. या कर्ज पुरवठ्यांचे अनुदान आणि परतफेड निश्चित स्वरूपात ठरलेली आहे. या आर्थिक सहकार्यामुळे बचत गटाच्या महिला अधिकाधिक रोजगार आणि नफा मिळवुन देणारे व्यवसाय करीत आहेत.



PRINCIPAL
Principal
Vasundhara College, Ghatnandur
Tq. Ambajogai Dist.Beed 431519

**OUR HERITAGE**
ISSN (Online) : 0474-9030 Vol-68, Special Issue-5
Impact Factor (2020) - 6.8
Special Issue on *"Sustainable Development Goals"*

सध्याच्या कर्जफेडीमुळे संस्था महिलांना विविध उद्योग सुरू करण्याकरीता प्रेरीत करून आर्थिक सहकार्य करीत आहेत.

**9) सामाजिक व आर्थिक विकास :**

बचत गटाच्या माध्यमातुन महिला विविध उद्योग व्यवसाय, व्यापार करीत आहेत. उद्योग व्यवसायामुळे महिला क्रियाशिल बनत असल्यामुळे सामाजिक विकासाला चालना मिळत आहे. महिला उद्योग व्यवसायातून आर्थिक नफा मिळवित असून तो नफा नवनवीन व्यवसायात गुंतावित आहेत. त्यामुळे राष्ट्र उत्पादन प्रक्रियेत गतीशिल होत आहे. उत्पन्नाच्या गतीतून राष्ट्राचा आर्थिक विकास घडून येत आहे.

**10) संशोधनाचे महत्व :**

बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी एकत्रीत यावे, त्यांनी अडचणीच्या वेळी परस्परांना बचतीतून अर्थसहाय्य करणे, स्वत:ची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी बीजभांडवल तयार करणे महिलांमध्ये संघटित शक्ती व आत्मविश्वास वाढवण्यासाठी परस्परांचे सहकार्य निर्माण करणे, बचतगटाकरीता कर्ज घेवून उद्योग व्यवसायाची उभारणी करून स्वत:चा समाजाचा आणि राष्ट्राचा आर्थिक विकास कशा पध्दतीने करता येईल याचे ज्ञान सदरील अध्ययनातून प्राप्त होईल.

**11) सारांश :**

बचतगट हा महिला सक्षमीकरण आणि दारिद्रय निर्मुलनाचा प्रभावी मार्ग आहे. बचतीच्या व व्यवसायाच्या माध्यमातून महिलांचा जीवन व आर्थिकस्तर उंचावणे बचतगटाचे उद्दिष्टे आहे. बचत गटाद्वारे समाज परिवर्तन आणि अर्थिक विकास ह्या उद्दीष्टाच्या पुर्ततीकरता विविध संस्था, शासन महिलांना आर्थिक सहकार्य करीत असल्यामुळे आज महिला बचत गटाचे महत्व वृंध्दीगत झालेले दिसून येते.

**12) संदर्भ सूची :**

[1] डॉ. सुधीर बोधनकर 'सामाजिक संशोधन पध्दती' साईनाथ प्रकाशन, नागपूर
[2] डॉ. प्रदिप अगलावे 'सामाजिक संशोधन पध्दती' साईनाथ प्रकाशन, नागपूर 2007.
[3] रविंद्र चव्हाण स्वयंसहाय्यता बचतगट आणि समाजिक अभिसरण' जानेवारी 2005.
[4] प्रा. व्ही एम. कुलकर्णी 'महिलांचे सबलीकरण, दारिद्रय निर्मुलन व स्वयंसहाय्यता गट' एप्रिल 2002.
[5] डॉ. सुधा कोठारी 'चालना महिला स्वयंसहाय्यतेकडे वाटचाल' राजगुरू नगर पुणे.
[6] राजेश चौधरी 'महिला बचतगट हस्तपुस्तिका' चौधरी लॉ पब्लिशर्स जळगांव डिसें. 2006
[7] www.nabard.com <http://www.nabard.com
[8] www.wikipedia.com <http://www.wikipedia.com

PRINCIPAL
Vasundhara College, Ghatnandur
Ta. Ambajogai Dist.Beed 431519